# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजे लाखनवाडा व मौजे रोहणा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व परिचारकांच्या रिक्त पदांबाबत**

**(१) २९१७५ (२१-०१-२०१६). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाखनवाडा व मौजे रोहणा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची व परिचारकांची पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना शहरात खाजगी रुग्णालयात उपचारासाठी यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत शासन तात्काळ कार्यवाही करणार आहे काय,

(४) तसेच, ग्रामीण भागातील रुग्णालयास आवश्यक असलेले ऑक्सिजन सिलेंडर, औषधे, एन्टी रेबीज लसी इत्यादी साहित्य नसल्यामुळे रुग्णसेवेवर त्याचा दुष्परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन उपरोक्त ओषधे व साहित्य पुरवठा करणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

मौजे लाखनवाडा व मौजे रोहणा येथे अनुक्रमे ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर आहे. ग्रामीण रुग्णालय, लाखनवाडा येथे एक वैद्यकीय अधिक्षक, तीन वैद्यकीय अधिकारी गट-अ व सात परिचारीकांची पदे मंजूर आहेत. यापैकी वैद्यकीय अधिक्षकाचे पद रिक्त असून सदर पदाचा कार्यभार सामान्य रुग्णालय, खामगाव येथील वैद्यकीय अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तीन पदांपैकी दोन पदांवर बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून एक पद रिक्त आहे. तर परिचारीकांची ३ पदे भरलेली असून ४ पदे रिक्त आहेत. परिचारीकांच्या सदर रिक्त पदांवर सामान्य रुग्णालय, शेगाव येथील २ परिचारिका प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्र, रोहणा येथे वैद्यकीय अधिका-यांची २ व परिचारिकांची ८ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर भागातील आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून सर्व जनतेला वेळोवेळी रुग्णसेवा पुरविण्यात येत आहे.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालयामध्ये ऑक्सिजन सिलेंडर, औषधे, एन्टीरेबीज लसी इत्यादी साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे रुग्णसेवेवर त्याचा दुष्परिणाम होत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पारव (ता.बसमत, जि.हिंगोली) येथे शासकीय जमिनीवर जलयुक्त शिवार योजनेतून गाव तलावाचे बांधकाम करण्याबाबत**

**(२) ३२६८३ (१२-०१-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पारव (ता.बसमत, जि.हिंगोली) येथे गट क्र.२० मध्ये ४.२० आर या शासकीय जमिनीवर जलयुक्त शिवार योजनेतून गाव तलावाचे बांधकाम करण्यासाठी संबंधित ग्रामसभेच्या ठरावासहित लोकप्रतिनिधीनी मा.राज्यमंत्री जलसंधारण यांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ अन्वये लेखी निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय जमिनीवर सत्वर तलावाचे बांधकाम करुन ग्रामस्थांना पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-१०-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.

(२) मा.लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण), विभाग, हिंगोली यांचेमार्फत मौजे पारवा मा. वसमत येथील गट क्र. २० मध्ये ४.२० हेक्टर आर जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे. सदर जागा सपाट असून गावतलावाच्या कामाकरिता तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याने योग्य नसल्याने दिनांक ३०/०६/२०१६ रोजीच्या अहवालाद्वारे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जलयुक्त शिवार अभियान राबविताना येणाऱ्या अडचणीबाबत

**(३) ३३२६६ (२१-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचे जलसंधारणाची असंख्य कामे जसे लघुसिंचन तलाव, पाझर तलाव, इत्यादीचे आर्थिक मापदंड कोणत्या वर्षापासून लागू झालेले आहेत,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीचा मोबदला आता ५ पटीने वाढल्यामुळे व गौण खनिज शुल्क रॉयल्टी यामध्ये वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत प्रचंड स्वरुपात वाढ होऊन सुधारित अंदाजपत्रके तयार करावी लागली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सुधारित अंदाजपत्रके आता आर्थिक मापदंडात बसत नसल्यामुळे त्यास शासनस्तरावर मान्यता होऊ शकत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील कारणामुळे आर्थिक मापदंडात बसत नसलेल्या परंतु या कामांवर खर्च झालेल्या कामाबाबत शासन भूमिका घेणार आहे काय ?

**प्रा. राम शिंदे (०५-१०-२०१६) :**(१) सध्या लघु पाटबंधारे योजनासाठी संपूर्ण महाराष्ट्राकरीता (कोकण प्रदेश वगळता) जलसंपदा विभागाचा शासन निर्णय दिनांक ३०/०४/२०११ नुसार तसेच कोंकण विभागाकरीता जलसंपदा विभागाचा शासन निर्णय दिनांक २९/०७/२००९ नुसार मापदंड प्रचलित होते. आता जलसंपदा विभागाच्या दिनांक १९/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मापदंड सुधारित करण्यात आलेले आहे.

(२) होय.

(३) व (४) अंशत: खरे आहे. तथापि, प्रचलित मापदंडात सुधारणा करण्याबाबतचा शासन निर्णय जलसंपदा विभागामार्फत दिनांक १९/०७/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला असून सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### जलपुरूष डॉ.राजेंद्र सिंह यांनी कोकणातील पाणी समस्येवर सूचविलेल्या उपाययोजनांबाबत

**(४) ३९८८६ (१४-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलपुरूष डॉ.राजेंद्र सिंह यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान संपूर्ण कोकणात ठिकठिकाणी जलयोजना परिषद घेतल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिषदांच्या माध्यमातून आणि कोकणातील पाण्याचा अभ्यास करून त्यांनी कोणत्या उपाययोजना सूचविल्या आहेत,

(३) असल्यास, या उपाययोजनांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-१०-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे
(२) परिषदांच्या माध्यमातून पाण्याच्या अभ्यासाबाबत सुचविण्यात आलेल्या उपाययोजना शासनास अद्याप अप्राप्त आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे येणेचवंडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या गावास निर्माण झालेल्या पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(५) ४५३८६ (३०-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे येणेचवंडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या गावांस पाणी पुरवठा करणारा पाझर तलाव कोरडा पडल्याने सदर गावात माहे जानेवारी, २०१६ पासून पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी टंचाईबाबत सदर गावांची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर गावाची पाणी टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०९-२०१६)** :(१) होय.
(२) याबाबत उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग क्र. ९ गडहिग्लज, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज व तहसिलदार, गडहिंग्लज यांनी संयुक्त पहाणी केलेली आहे.
(३) तपासणी पथकाच्या अहवालास अनुसरुन सहायक जिल्हाधिकारी, गडहिंग्लज यांनी दिनांक १४/३/२०१६ रोजीचे आदेशान्वये मौजे येणेचवंडीचे क्षेत्र दिनांक १५/३/२०१६ ते दिनांक ३१/५/२०१६ या कालावधीकरिता पाणी टंचाई क्षेत्र म्हणून घोषित केले होते. सदर गावाशेजारील बिरंजे वस्ती येथे दिनांक २४/४/२०१६ रोजी नवीन विंधण विहिर खोदून तेथे पुरेसे पाणी लागल्याने त्यावर हात पंप बसवून गावात पाणीपुरवठा सुरु केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**भरवीर खु.ता.इगतपुरी (जि.नाशिक) येथील उपसा सिंचन योजनांच्या निविदा प्रक्रियेला दिलेली स्थगिती रद्द करण्याबाबत**

**(६) ४५४७० (०३-०५-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) मतदार संघातील भरवीर खु.ता.इगतपुरी येथील उपसा सिंचन योजनांच्या निविदा प्रक्रियेला दिलेली तात्पुरती स्थगिती उठवून कार्यारंभ आदेश देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४९० हेक्टर आदिवासी क्षेत्र सिंचनाखाली आणणाऱ्या उक्त उपसा सिंचन योजनांच्या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती उठविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१२-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

याप्रकरणी मा.राज्यमंत्री (जलसंपदा व जलसंधारण) यांना उद्देशून लिहिलेले मा.विधानसभा सदस्य श्री.राजाभाऊ (पराग) वाजे यांचे दिनांक ९/१२/२०१५ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.
(२) दिनांक १४/१/२०१५ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या ४८ व्या बैठकीत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत दिनांक १/४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या १२०० योजना तसेच दिनांक १/४/२०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता परंतु प्रत्यक्षात क्षेत्रीय कामे सुरु झाली नाहीत अशा सर्व योजनांबाबत सुध्दा स्थगिती देण्यात यावी. जेणेकरुन महामंडळाचे आर्थिक दायित्व कमी होऊन मर्यादित करणे शक्य आहे व अशा सर्व योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासून, योजना तांत्रिकदृष्टया योग्य/अयोग्य असल्याबाबत, महामंडळातर्गत पुणे व नागपुर येथे कार्यरत दोन मुख्य अभियंते तसेच जलसंपदा विभागाच्या एक मुख्य अभियंता यांची समिती गठीत करुन अहवाल सादर करावा. समितीने योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासतांना जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निश्चित केलेले निकष, राज्यातील दुष्काळग्रस्त भाग, पाणीटंचाई, योजनेतील त्या भागातील आवश्यकता, योजनेची सद्य:स्थिती इत्यादी बाबींचा सर्वंकष विचार करुन, अहवाल प्राप्त झाल्यानंतर संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असा ठराव मंजुर करण्यात आला आहे. सदर समितीचा अहवाल दिनांक २८/७/२०१५ रोजी महामंडळाला प्राप्त झाला.

दिनांक २४/९/२०१५ रोजीच्या संचालक मंडळाच्या ४९ व्या बैठकीत दिनांक १/४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या १२०० योजना तसेच दिनांक १/४/२०१४ पूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्षात क्षेत्रीय कामे सुरु झाली नाहीत अशा ११३० जलसंधारण योजनेपैकी जलयुक्त शिवार योजने अंतर्गत प्रस्तावित असलेल्या १०१ योजना वगळून उर्वरित योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला. भरवीर खु. ता. इगतपुरी येथील दोन योजनांचा स्थगिती दिलेल्या ११३० योजनांमध्ये समावेश असून प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची कार्यवाही महामंडळस्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साक्री तालुक्यातील विशेषत: आदिवासी भागातील बऱ्याच पाझर तलावाच्या एमआयटँकची दुरवस्था झाल्याबाबत**

**(७) ४५५१४ (३०-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील विशेषत: आदिवासी भागात बऱ्याच पाझर तलावाचे एमआयटँक नादुरुस्त आहेत परंतू सदरचे पाझर तलाव दुरुस्त होत नसल्याने या भागात पुरेसा पाऊस पडुनही अशा पाझर तलावामध्ये पाणी साठत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे फुटलेले/नादुरुस्त झालेले पाझर तलावाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-१०-२०१६) :**(१) हे अंशतः खरे आहे.
(२) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पाझर तलावांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांमध्ये महिला व मुलांकरिता असलेल्या सहाय्य कक्षातील समुपदेशकांचे मानधन थकित असल्याबाबत**

**(८) ४७७९८ (२०-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील पोलीस ठाण्यांमध्ये महिला व मुलांकरिता असलेल्या सहाय्य कक्षात समुपदेशकांना नियुक्त करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर समुपदेशकांचे मानधन माहे जून, २०१५ पासून अदा करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, सदर समुपदेशकांच्या कुटूंबियांवर उपासमारीची वेळ आली असून पोलीस ठाण्यातील समुपदेशन प्रक्रियेवर सुध्दा प्रतिकूल परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) बुलढाणा जिल्हयातील पोलीस स्टेशनच्या आवरामध्ये महिला व मुलांकरिता एकूण ०४ समुपदेशन केंद्र कार्यरत असून त्यामध्ये समुपदेशकांना स्वंयसेवी संस्थेमार्फत नियुक्त करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्ह्यातील समुपदेशकांचे माहे नोव्हेंबर, २०१५ पर्यातचे मानधन अदा करण्यात आले आहे व त्यापुढील कालावधीचे मानधन समुपदेशकांना अदा करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या चांदोली राष्ट्रीय अभयारण्यात वाघांच्या अस्तित्वाबाबत**

**(९) ५३७०५ (२४-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या चांदोली राष्ट्रीय अभयारण्यात गत वर्षी वाघ आढळून आले परंतु चालू वर्षी पाहणीत वाघ आढळून आले नसल्याने वाघांच्या अस्तित्वाबद्दल प्रश्न निर्माण झाल्याचे माहे मे २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैशाख पोर्णिमे दरम्यान चांदोलीच्या जंगलात दिनांक १५ मे ते २२ मे दरम्यान प्राणी गणना झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाघांचे अस्तित्व न आढळण्याचे काय कारणे आहेत,

(४) असल्यास, वाघांची संख्या वाढवण्यासाठी प्रशासन काय उपाययोजना करीत आहे

(५) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही. चांदोली राष्ट्रीय उद्यानात वाघाच्या अस्तित्वाचे माहे मार्च, २०१६ मध्ये अप्रत्यक्ष पुरावे तर लगतच्या राधानगरी अभयारण्यात जानेवारी २०१६ ते मे २०१६ ह्या दरम्यान अस्तित्वाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पुरावे प्राप्त झाले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील वाघांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- व्याघ्र पुनर्प्राप्ती कार्यक्रम (Recovery Program) आणि दिर्घकालीन संनियंत्रण कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात वाघाच्या अधिवासाचा अभ्यास करणे, अधिवासाची पुनर्प्रात्ती (Recovery) आणि तृणभक्षी प्राण्याची संख्या वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
- व्याघ्र प्रकल्पांच्या सभोवती असणा-या गावामध्ये व्याघ्र संवर्धनाविषयी समुपदेशन व शिक्षण कार्यक्रमे राबविणे जेणेकरुन व्याघ्र अधिवासाविषयी जनतेच्या मनात आपूलकी निर्माण करणे.

- कॉरीडॉर व बफर क्षेत्रामध्ये संरक्षण कार्यवाही चालू असून गाभा क्षेत्रामध्ये मानवी वावरास पूर्णपणे निर्बंध घालणेत आले आहेत.
- वनांवरील अवलंबित्व कमी करणे व मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राच्या बफर क्षेत्रातील गावात डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजना राबवण्यात येत आहे.
- कुरण विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामुळे तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढून वाघांचे भक्ष सहजपणे उपलब्ध होईल.
- व्याघ्र राखीव क्षेत्रात पाणवठ्यांची संख्या वाढविण्यात येऊन त्यात सतत पाणी पुरवठा करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलापूर-उरण रेल्वे प्रकल्पातील खारकोपर ते रांजणपाडा दरम्या असलेली तीन किमी जमिन वन विभागाची असल्याने प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ५३७३१ (२४-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलापूर-उरण रेल्वे प्रकल्पातील खारकोपर ते रांजणपाडा दरम्यान असलेली तीन किमी जमिन वन विभागाची असल्याने या प्रकल्पाला अद्यापही मान्यता मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याकरिता वन विभागाची परवानगी प्राप्त करण्याकरिता शासनाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात आले आहे

(३) असल्यास, या प्रकल्पाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) बेलापुर-उरण रेल्वे प्रकल्पातील खारकोपर ते रांजणपाडा दरम्यान असलेल्या तीन कि. मी. मध्ये वनक्षेत्र बाधीत होत असल्याने सदर क्षेत्रात रेल्वे प्रकल्पाचे काम करण्यापूर्वी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वन जमीन मागणीचा प्रस्ताव दाखल करुन त्यास केंद्र शासनाची पूर्व परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि, सदर प्रकल्पाबाबत कोणत्याही प्रकल्प यंत्रणेकडून प्रस्ताव अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. संबंधित प्रकल्प यंत्रणेकडून वनजमीन मागणीचा प्रस्ताव प्राप्त होताच त्यावर वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील मार्गदर्शक सुचनांनुसार संस्करण करुन केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

---

**अकोला जिल्हयातील शिवापूर शिवारात पाच रोहींचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याबाबत**

**(११) ५३८६८ (२४-०७-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील शिवापूर शिवारा नजीक जंगलातील पाण्याच्या स्त्रोत संपल्याने माहे एप्रिल २०१६ मध्ये पाच रोही निलगाय पाण्याची भटकंती करीत असतांना विहिरीत पडून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जंगलातील पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत आटल्याने वनविभागाच्या वतीने जंगली प्राण्यांकरीता वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून पाणी उपलब्ध करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनविभागाचे सहायक वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.आर.एस. कातखेडे यांचावर सदर प्रकरणाचे जबाबदारी निश्चित करून शासनाने चौकशी केली आहे काय.

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) दिनांक ०१.०४.२०१६ रोजी मौजे शिवापूर येथील खाजगी गट क्रमांक ११२ मध्ये खोदकाम होत असलेल्या नवीन विहीरीत पडून पाच रोहींचा मृत्यू झाला आहे. सदर घटना स्थळाजवळच कक्ष सी ८५ मध्ये दोन मातीबंध असून त्यामध्ये वन्यप्राण्यांना पिण्याकरीता माहे एप्रिल, २०१६ पर्यत पाणी उपलब्ध होते.

(२) व (३) जंगल क्षेत्रात वन्यप्राण्यांना पिण्याकरीता पाणी उपलब्ध व्हावे म्हणून नैसर्गिक स्त्रोत आटल्यावर आवश्यतेनुसार व निकडीनुसार टँकरद्वारे पाणी कृत्रिम पाणवठयात उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये अनेक जंगलामध्ये वाघ, बिबट्या व इतर वन्य जीवांचा उपासमारीने मृत्यू होत असल्याची घटना**

**(१२) ५३८७२ (२४-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये अनेक जंगलामध्ये वाघ, बिबट्या व इतर वन्य जीवांचा उपासमारीने मृत्यू होत असल्याच्या अनेक घटना माहे एप्रिल २०१६ मध्ये निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वन्य जीव अन्नाच्या शोधात लोकवस्तीमध्ये येत असल्याने लोकांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन्य जीव प्राणी वाचवण्यासाठी व संख्या वाढवण्यासाठी शासन काय उपाययोजना करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही.

(३) वन्यप्राण्यांचा जीव वाचवण्याच्या व त्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- पेंच व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प येथे विशेष व्याघ्र संरक्षण दल तयार करण्यात आलेले आहे.
- वन्यप्राणी, वाघ शिकार प्रकरणामध्ये गुन्हेगाराचा छडा लावण्याच्या दृष्टीने Call Detail Record चा उपयोग केला जात आहे.
- स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचेमार्फत नियमित गस्तीव्दारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे संनियंत्रण करण्यात येते, याकरीता साधन सामुग्री जसे कॅमेरा ट्रॅप, दुर्बिण व जीपीएस यांचा वापर करण्यात येतो.
- सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात बिनातारी संदेश यंत्रणा कार्यान्वीत असून तात्काळ संपर्काकरीता वाहनांवर वायरलेस संच बसविण्यात आलेले आहेत. क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी यांना वॉकी टॉकी संच पुरविण्यात आलेले आहेत.
- वन्यप्राणी उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या शोधात नागरी वस्त्यांकडे फिरकू नये, त्यांना वनातच पिण्यांचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव/खोदतळे बांधणे, कृत्रिम पाणवठे, (सिमेंट टाके बांधणे) इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
- वनाच्या सिमेलगत असलेल्या तोंडी नसलेल्या विहिरींना कठडे करण्यांत आले आहे.
- व्याघ्र प्रकल्पाच्या वनक्षेत्रातून गेलेल्या विद्युत लाईनवर गस्त करण्यात येते.
- अपघाती मृत्यूला आळा घालण्यासाठी वाहतुकीच्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत गतीरोधक व विविध ठिकाणी वेग मर्यादा पालन करण्याच्या सूचना फलक लावण्यात आलेले आहे.
- लोकांनी जंगलात जाउुन मानव-वन्यजीव संघर्ष होऊ नये म्हणून उपलब्धतेनुसार गावक-यांना निस्तार दरावर फाटे, बांबू व सरपण उपलब्ध करुन देण्यात येते.
- ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून विविध योजनेतून एलपीजी गॅसचा पुरवठा करण्यात आला आहे.
- जिल्हा व्याघ्र कक्ष समितीची स्थापना करण्यात आलेली असून त्यामध्ये मानव वन्यजीव संघर्षाच्या प्रकरणांचा आढावा घेण्यात येतो.
- रॅपिड रिस्पॉन्स चमूची स्थापना करण्यात आलेली असून त्यांना सर्व साहित्यासह वाहन उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर चमूव्दारे सतत गस्ती करुन मानव वन्यजीव संघर्ष रोखण्याचे कार्य करण्यात येत आहे.
- चंद्रपूर, अमरावती व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यात आले असून त्यांचेव्दारे नियमितपणे रेल्वे स्टेशन/बस स्टँड/आठवडी बाजार व संशस्यास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांच्या अवैध व्यापार, वाहतूक याचा शोध घेण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही पळसगांव वनपरिक्षेत्रातील उमा नदीत वाघीणीचा मृतदेह आढळल्याबाबत

**(१३) ५३९७९ (२४-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही पळसगांव वनपरिक्षेत्रातील उमा नदीच्या पात्रात माहे एप्रिल २०१६ मध्ये वाघीण मृत्यू झाल्याचे झाल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वाघीणीचा पाच दिवसापूर्वी मृत्यू झाल्याचा अंदाज सिंदेवाही पळसगांव वनपरिक्षेत्रातील अधिकाऱ्यांना अंदाज भाकीत केलेला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, पुर्व विदर्भातील अभयारण्यामध्ये मागील अनेक महिन्यापासून वाघांची शिकार होत आहे, हे खरे आहे काय

(४) सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करून संबधीत अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे काय

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी वन विभागातील सिंदेवाही वन परिक्षेत्रातील नवरगाव उपक्षेत्रामध्ये असलेल्या हुमा नदीच्या पात्रात (पाण्यात) वाघ मृतावस्थेत पडलेला असल्याची बाब दिनांक ८.४.२०१६ रोजी निदर्शनास आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) पशुवैद्यकीय अधिकारी यांनी शवविच्छेदन अहवालात असे नमूद केले आहे की सदर वाघिणीचा देह, अवयव कुजलेले असल्याने मृत्यूच्या कारणाबद्दल मत देता येत नाही. सदर वाघिणीच्या शवातील नमुने काढण्यात आले असून ते परिरक्षणासाठी फॉरेन्सिक प्रयोगशाळा नागपूर व हैदराबाद येथे पाठवण्यात आले आहेत अद्याप तपासणी अहवाल अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील जंगलात बेसुमार व अनियंत्रित वृक्ष तोड व सतत लागणाऱ्या वणव्यामुळे वनसंपदे बरोबर सजीव सृष्टी धोक्यात आल्याबाबत

**(१४) ५४१०० (२४-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील जंगलात बेसुमार व अनियंत्रित वृक्षतोड व सतत लागणाऱ्या वणव्यामुळे वनसंपदेबरोबर सजीव सृष्टी धोक्यात आल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे बेकायदेशीररित्या वृक्षतोड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अधिकारी व बेकायदेशीर रित्या वृक्षतोड करणाऱ्या व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.
तथापि, सुधागड वनक्षेत्रात माहे मे, २०१६ मध्ये वृक्षतोडीचे ९ वनगुन्हे व आगीच्या ३ घटना घडल्या आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) वरील घटनेपैकी अवैध वृक्षतोडीच्या एक वनगुन्ह्यात आरोपी आढळून आला आहे. सदर आरोपीकडून रु. २०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**यावल (जि.जळगांव) अभयारण्यातून बाबूंची सर्रास तस्करी सुरु असल्याबाबत**

**(१५) ५४५९७ (२४-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगांव) अभयारण्यातून बाबूंची सर्रास तस्करी सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच वन जमिनी बळकावण्यासाठी उन्हाळयाचे कारण पुढे करत तेथे कृत्रिम वणवा पेटवत असल्याची तक्रार वन्यजीव संरक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यावल प्रादेशिक विभागाचे वनसंरक्षक अधिकारी यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या तक्रारीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साटेली-भेडली (जि.सिंधुदुर्ग) येथील विश्रामगृह तसेच**
**वनविभागाच्या इमारतींची झालेली दुरवस्था**

**(१६) ५४६४२ (२४-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वन विभागाच्या वतीने मागील २५ वर्षापूर्वी उभारण्यात आलेल्या साटेली-भेडली येथील विश्रामगृह तसेच वनविभागाच्या इमारतींची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतींच्या खिडक्या, दरवाजे गायब झालेले आहे त्यांना कोंडवाडयांचे स्वरूप निर्माण झालेले आहे, पाण्याची टाकी, पंप नादुरूस्त अवस्थेत पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सदरहू सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत संपूर्ण इमारतींचा नवीन प्रस्ताव करून पूर्वीचे विश्रामगृह नव्या स्वरूपात उभारून या विश्रामगृहाला नवी झळाळी देण्यात यावी, अशी मागणी त्या परिसरातील ग्रामस्थांनी मा.वनेमंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, उपवन संरक्षक कोल्हापूर, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग आदींकडे मागील ३ वर्षापासून सातत्याने लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१०-२०१६)** :(१) साटेली भेडली येथील विश्रामगृह इमारतीच्या बाहेरील बाजू चांगली असून, स्वयंपाक गृह व मजूर गृह हे निकामी झालेले आहे. तसेच इमारतीच्या आतील भागाच्या भिंतीस तडे गेले असून, छप्पर तुटलेले आहे.

(२) इमारतीच्या खिडक्या, दरवाजे इत्यादी वस्तू तुटलेल्या असून, खराब झालेल्या आहेत. मात्र खिडक्या, दरवाजे वन विश्रामागृहातच आहेत. पाण्याची टाकी चांगल्या अवस्थेत आहे. सदर ठिकाणी मोटारपंप बसवलेला नाही. पंप बसविण्यासाठी पाया तयार करण्यात आलेला आहे.

(३), (४) व (५) विश्रामगृहाची आवश्यकता असल्यामुळे सन २०१६-१७ च्या आराखडयात समावेश करुन, दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**ठाणे शहरातील घोडबंदर रस्ता रुंदीकरणाच्या वन जमिनीवरील प्रलंबीत प्रकल्पाबाबत**

**(१७) ५५१७० (२४-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील घोडबंदर रस्ता रुंदीकरणामध्ये, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा बाधित होणारा भाग पातलीपाडा, येथील नेचर पार्क, टिकुजिनीवाडी रस्ता, येऊर येथे आदिवासी कल्चरल व आर्ट सेंटर आणि येऊर येथील फुटहिल रोड आदी वन जमिनीवरील गेल्या अनेक वर्षापासूनचे प्रलंबित प्रकल्प तीन महिन्यांत मार्गी लावण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे प्रस्ताव राज्यस्तरीय वन्य जीव संरक्षक मंडळाकडे, त्यानंतर राष्ट्रीय वन्य जीव संरक्षक मंडळाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविणेबाबत माहे जुन २०१६ अखेरपर्यंत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(३) तसेच, सदरहू प्रस्ताव केंद्र सरकारकडे, पाठविला असल्यास सदरहू प्रस्तावास, त्वरीत अंतिम मंजूरी मिळण्याच्या दृष्टीने, राज्य शासनातर्फे केंद्र सरकार बरोबर कोणती कार्यवाही करुन प्रयत्न करण्यात आले आहे,

(४) अद्याप, शासनाने कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६)** :(१) दिनांक १३.०४.२०१६ रोजी मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदरहू प्रकल्प मार्गी लावण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) घोडबंदर रस्ता रुंदीकरणासाठी वनक्षेत्र वळतीकरण व पातलीपाडा येथे वन विभागाच्या जागेवर निसर्ग उद्यान विकसित करणे तसेच येऊर येथे आदिवासी कल्चरल व आर्ट सेंटर विकसित करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिका, ठाणे यांचेकडून प्राप्त प्रस्तावत काही त्रुटी आढळून आल्याने सदर त्रुटींची पूर्तता करण्याबाबत महानगरपालिका, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.

टिकुजिनीवाडी येथील रस्त्याचे दुरुस्तीकरिता परवानगी देण्यात आली असून सदर रस्त्यांचे दुरुस्तीचे काम महानगरपालिका, ठाणे यांचेमार्फत करण्यात आलेले आहे.

फुटहिल रोड संबंधीचा प्रस्ताव महानगरपालिका, ठाणे यांचेकडून अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलडाणा) तालुक्यातील करवंड, उद्री लागून असलेल्या वनक्षेत्रातील अस्वल्याने हल्ला केल्याबाबत**

**(१८) ५५३३० (२४-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलडाणा) तालुक्यातील करवंड, उद्री लागून असलेल्या वनक्षेत्रातील अस्वल्याने हल्ला केल्याने लालसिंग पवार या ५८ वर्षीय शेतकऱ्यांचा मृत्यु झाल्याची घटना दिनाक १५ मे, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हा हल्ला झाल्याने याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) तसेच मृत शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना कोणती आर्थिक वा अन्य मदत करण्यात आली आहे वा त्या शेतकऱ्यांच्या वारसाना वन विभागाच्या नोकरीत सामावून घेण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१), (२) व (३) दिनांक २२.०५.२०१६ रोजी मौजे करवंड येथील वनक्षेत्रास लागून असलेल्या शेतामध्ये श्री.लालसिंग सेवा पवार, रा करवंड या शेतकऱ्यांचा अस्वल या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे, हे खरे आहे.

(४) मृत शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना तात्काळ मदत म्हणून रु. १०,०००/- देण्यात आले असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित मृत शेतकऱ्यांच्या कायदेशीर वारसास रु.८,००,००० अदा करण्यात आले आहेत. प्रचलित शासन निर्णयानुसार मृत व्यक्तीच्या वारसास वन विभागाच्या नोकरीत सामावून घेण्याची तरतुद नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील धाड परिसरातील जंगलामध्ये होत असलेली अवैध वृक्षतोड**

**(१९) ५५३३९ (२४-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील धाड परिसरातील जंगलामध्ये अवैध वृक्षतोड खुलेआम सुरु असून रानमेवा, करवंदे, चिघोर, टेंभुर्णी ही मौल्यवान वनस्पतींची झाडे नामशेष होत असल्याने जंगलच नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी वन विभागाने कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) धाड परिसरामध्ये माहे मे, २०१६ च्या सुमारास रानमेवा, करवंदे, चिघोड, टेंभुर्णी सारख्या मौल्यवान झाडांची तोड निदर्शनास आली नाही.

तथापि,बुलडाणा परिक्षेत्रामध्ये माहे मे, २०१६ व जुन, २०१६ मध्ये घडलेल्या सागवानाच्या अवैध वृक्षतोडीच्या वनगुन्हयांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | महिना | वनगुन्हे संख्या | सागवान वृक्ष संख्या | घ.मी. | नुकसानी किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे, २०१६ | १ | १४ | ०.२८२ | १३१२२ |
| २ | जून, २०१६ | १ | ९ | ०.१२६ | ५८८३ |

(२) अवैध वृक्षतोडीला पायबंद घालण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत :-

- वनक्षेत्रात क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत नियमितपणे गस्त घालण्यात येते.
- नियमितपणे बिट तपासणीचा कार्यक्रम राबविला जातो.
- अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीची मदत घेतली जाते.

(३) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिल्लोड अंजिठा (जि.औरंगाबाद) तालुक्यातील वन परिक्षेत्रात वन विभागाने वन्यजीवांसाठी तयार केलेले पाणवठे वनविभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे कोरडे पडल्याने**

**(२०) ५६०३८ (२४-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड अंजिठा (जि.औरंगाबाद) तालुक्यातील वन परिक्षेत्रात वन विभागाने वन्यजीवांसाठी तयार केलेले पाणवठे वनविभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे कोरडे पडल्याने वन्यप्राणांना पाण्याविना रहावे लागत असल्याचे माहे मे-२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सिल्लोड येथील वन परिक्षेत्रातील वन्यप्राण्यासाठी पाण्याची सोय करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाणी उपलब्ध व्हावे म्हणून सिल्लोड वनपरिक्षेत्रात ६ नैसर्गिक बारमाही तर २ कृत्रिम पाणवठे आहेत. तसेच अजिंठा वनपरिक्षेत्रात पूर्वीचे १५ तर सन २०१५-१६ मध्ये नवीन ४ पाणवठे तयार करण्यात आले आहेत. सदर कृत्रिम पाणवठयामध्ये माहे मे, २०१६ मध्ये आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील कोल्हार वन्य परिसरात उपासमारीने एका बिबटयाची मृत्यु झाल्याची घटना**

**(२१) ५६१६८ (२४-०८-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील कोल्हार वन्य परिसरात उपासमारीने एका बिबटयांचे मृत्यु झाल्याची घटना असताना आणखी एका बिबट्यांचा मृतदेह या परिसरात आढळल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील घटनेची चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वन्यप्राण्याची दुर्दैवीरित्या उपासमारीने मृत्यु होऊ नये याकरीता कोणती उपाययोजना केला वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) व (२) अहमदनगर वनविभागातील कोपरगाव वनक्षेत्रातील कोल्हार, ता. राहाता येथे माहे एप्रिल, २०१६ मध्ये एका बिबट्याच्या शव विच्छेदन अहवालात मृत्यूचे संभाव्य कारण उपासमारी व त्यामुळे रक्ताभिसरण बंद होऊन धक्क्याने मृत्यू असे नमूद केले आहे. मात्र दुसऱ्या बिबट्याच्या शव विच्छेदन अहवालत मृत्यूचे संभाव्य कारण यकृताचा विकार असे नमूद केले आहे.

(३) सदर परिसरात जंगल क्षेत्र नसल्याने सामान्यत: बिबट्याचे भक्ष्य कुत्री, डुकरे, शेळया व इतर जनावरे असतात. त्यामुळे त्यांच्या भक्षाबद्दल उपाययोजना करणे अपेक्षित नाही. तथापि स्थानिक जनतेत जनजागृती निर्माण करण्यात येऊन स्थानिकांच्या मदतीने वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा करुन देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात तीन वाघांचा झालेला मृत्यु**

**(२२) ५६५३१ (२४-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात एप्रिल व मे, २०१६ च्या दरम्यान तीन वाघांचा मृत्यु झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मृत वाघांची वन विभागाने चौकशी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, वाघांचा मृत्यु होऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात माहे एप्रिल, २०१६ व मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान १ वाघांचा मृत्य झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) सदर मृत वाघाचे सर्व अवयव शाबूत असल्याने शिकारीसाठी वाघाची हत्या झाल्याचे निष्पन्न होत नाही. सदर वाघाचा विसेरा पूर्णपणे सडलेला होता तथापि विषबाधा तपासणीसाठी विसेरा न्याय वैद्यकीय शाळेत पाठविला असता सदर वाघाचा मृत्यू विषबाधेमुळे झाला नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे
(४) वाघांचे मृत्यू होऊ नये म्हणून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.
- पेंच व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प येथे विशेष व्याघ्र सरंक्षण दल तयार करण्यात आलेले आहे.
- वन्यप्राणी, वाघ शिकार प्रकरणामध्ये गुन्हेगाराचा छडा लावण्याच्या दृष्टीने Call Detail Record चा उपयोग केला जात आहे.
- स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचेमार्फत नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालीचे संनियत्रण करण्यांत येते, याकरिता साधन सामुग्री जसे कॅमेरा ट्रॅप, दुर्बिण व जीपीएस यांचा वापर करण्यांत येतो.
- सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वीत असून तात्काळ संपर्काकरीता वाहनांवर वायरलेस संच बसविण्यात आलेले आहेत. क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी यांना वॉकी टॉकी संच पुरविण्यात आलेले आहेत.

- वन्यप्राणी उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या शोधात नागरी वस्त्यांकडे फिरकू नये, त्यांना वनातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव/खोदतळे बांधणे, कृत्रिम पाणवठे, (सिमेंट टाके बांधणे) इत्यादी उपाययोजना करण्यांत आलेल्या आहेत
- वनाच्या सिमेलगत असलेल्या तोंडी नसलेल्या विहिरीना कठडे करण्यांत आले आहे.
- व्याघ्र प्रकल्पाच्या वनक्षेत्रातून गेलेल्या विदयुत लाईनवर गस्त करण्यांत आले आहे.
- अपघाती मृत्यूला आळा घालण्यासाठी वाहतुकीच्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत गतीरोधक व विविध ठिकाणी वेग मर्यादा पालन करण्याच्या सुचना फलक लावण्यांत आलेले आहे.
- लोकांनी जंगलात जाऊन मानव-वन्यजीव संघर्ष होऊन नये म्हणून उपलब्धतेनुसार गावकऱ्यांना निस्तार दरावर फाटे, बांबू व सरपण उपलब्ध करुन देण्यांत येते.
- ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून विविध योजनेतून एलपीजी गँसचा पुरवठा करण्यांत आला आहे.
- जिल्हा व्याघ्र कक्ष समितीची स्थापना करण्यांत आलेली असून त्यामध्ये मानव वन्यजीव संघर्षाच्या प्रकरणांचा आढावा घेण्यात येतो.
- रॅपिड रिस्पॉन्स चमूची स्थापना करण्यांत आलेली असून त्यांना सर्व साहित्यासह वाहन उपलब्ध करुन देण्यांत आले आहेत. सदर चमूद्वारे सतत गस्ती करुन मानव वन्यजीव संघर्ष रोखण्याचे कार्य करण्यांत येत आहे.
- चंद्रपूर, अमरावती व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यात आले असून त्यांचेद्वारे नियमितपणे रेल्वे स्टेशन/बसस्टँड/आठवडी बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांच्या अवैध व्यापार, वाहतूक याचा शोध घेण्यात येतो.

---

**राधानगरी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) कसबा वाळवे पाझर तलावाची झालेली दुरवस्था**

**(२३) ५६९०५ (२४-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) कसबा वाळवे पाझर तलावाची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाझर तलावाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर पाझर तलावाची लवकरात लवकर दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०३-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मंगरुळ (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा झालेला मृत्यु**

**(२४) ५७४६५ (२४-०८-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मंगरुळ (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे बिबट्याच्या केलेल्या हल्ल्यात महिला ठार झाल्याची घटना दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बिबट्याच्या हल्ल्यात मृत झालेल्या महिलच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) व (२) दिनांक १६.०४.२०१६ रोजी सकाळी ९.०० वाजता सौ. सगुणाबाई दादाभाऊ खराडे, वय वर्ष ५५ रा. मंगरुळ, ता. जुन्नर या शेतात जनावरांसाठी गवत काढण्यासाठी गेल्या असता बिबट्याने केलेल्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला आहे.

(३) प्रचालित शासन निर्णयातील तरतूदीनुसार मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारस, त्यांचे पतीस रक्कम रु. ८,००,०००/- अदा करण्यात आलेले आहेत

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील चित्री निसर्ग पर्यटन प्रस्तावाला मंजूरी व निधी देण्याबाबत**

**(२५) ५७६२३ (२३-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा वार्षिक योजना २०१६-१७ मधून चित्री निसर्ग पर्यटन प्रस्तावाला मंजूरी व निधी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पालक मंत्री यांचेकडे माहे मार्च, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदरहू निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी वन विभागामार्फत आराखडा तयार करण्यात आला असून सदरहू आराखडा कोल्हापुर जिल्हा पर्यटन विकास आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वन्यप्राण्यांचा उपद्रवामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान होत असल्याबाबत**

**(२६) ५७८४१ (२४-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन्यप्राण्यांचा उपद्रवामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या धान, गहू, हळद, आदी महत्वाच्या पिकांचे अतोनात नुकसान होत असल्याबाबतची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वन्यप्राण्यांचा कायमचा बंदोबस्त व्हावा याकरीता गावातील शेतकऱ्यांनी वन अधिकाऱ्यांकडे बरेचदा अर्ज करुन सुध्दा त्यावर कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वन्यप्राण्याच्या उपद्रवामुळे शेतावर काम करण्यास जाणाऱ्या शेतमजुरांच्या जीवाला सुध्दा धोका निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या वन्यप्राण्याचा उपद्रवामुळे शेतातील पिकांचे नुकसान होणाऱ्या शेतमालकांना वन विभागाकडून नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-११-२०१६) :**(१) राज्यात वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे माहे मे, २०१६ मध्ये शेतपिकांचे नुकसान झाल्याची १७३३ प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार माहे मे, २०१६ मध्ये वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतपिकांचे नुकसान झालेल्या १७३३ प्रकरणामध्ये संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाईपोटी रु. ८५.४८ लक्ष अदा करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील कोंढाली वनपरिक्षेत्रातील कचार सावंगा जाम नदीकाठाच्या परिसरातील अवैध सागवान झाडांची वृक्षतोड करण्यात आल्याबाबत**

**(२७) ५८०८२ (२४-०८-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील कोंढाली वनपरिक्षेत्रातील कचार सावंगा जाम नदीकाठाच्या परिसरातील राजस्व खात्यातील तसेच शेतकऱ्यांची परवानगी न घेता अवैध सागवान झाडांची

वृक्षतोड करण्यात आली असल्याबाबतची तक्रार दक्षता पथकाचे विभागीय वनधिकारी के.एफ.डोंगरे यांच्याकडे माहे जुन, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैधरित्या वृक्षतोड करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-१०-२०१६)** :(१) श्री.इस्माईलखान सत्तारखां पठाण मु. पो. कचारी सावंग, ता.काटोल, जि.नागपुर यांनी दिनांक २.५.२०१६ रोजी तक्रार उपवनसंरक्षक नागपुर यांच्याकडे केलेली आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी चौकशीमध्ये परवानगीत कटाई केलेल्या नालामध्ये अवैध कटाईच्या नाल मिसळून पार्सिंग करणे व नदी पात्रातील वृक्षाला कटाईची परवानगी देणे या अनियमितता आढळल्या असून याबाबत दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नागपूर, मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघांवर विषप्रयोग होत असल्याबाबत**

**(२८) ५८२९८ (२४-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री. सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघांवर विषप्रयोग होत असल्याचे माहे मे २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर भागातील गावकरी सुद्धा वनविभागावर प्रचंड नाराज असल्याने रागाचे पर्यवसानातून हा प्रकार घडला असावा असा संशय व्यक्त करण्यात येतो, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय

(४) असल्यास, वाघांची संख्या वाढविण्यासाठी शासन काय प्रयत्न करत आहे

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पचंबा नियतक्षेत्रात दि.२२.०५.२०१६ रोजी १ (नर) वाघ व वैराट नियतक्षेत्रात दि.२७.५.२०१६ रोजी १ (मादी) वाघ मृतावस्थेत आढळून आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रथमदर्शनी दोन्ही वाघांचे मृत्यु नैसर्गिकरित्या झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर दोन्ही वाघांच्या न्यायवैद्यिकय तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे कारण निश्चित कळू शकेल.

(४) वाघांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

* पेंच व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प येथे विशेष व्याघ्र सरंक्षण दल तयार करण्यात आलेले आहे.

* वन्यप्राणी, वाघ शिकार प्रकरणामध्ये गुन्हेगाराचा छडा लावण्याच्या दृष्टीने Call Detail Record चा उपयोग केला जात आहे.

* स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचेमार्फत नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे संनियंत्रण करण्यांत येते, याकरिता साधन सामुग्री जसे कॅमेरा ट्रॅप, दुर्बिण व जीपीएस यांचा वापर करण्यांत येतो.

* सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वीत असून तात्काळ संपर्काकरीता वाहनांवर वायरलेस संच बसविण्यांत आलले आहेत. क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी यांना वॉकी टॉकी संच पुरविण्यांत आलेले आहेत.

* वन्यप्राणी उन्हाळयामध्ये पिण्याच्या पाण्याच्या शोधात नागरी वस्त्यांकडे फिरकू नये, त्यांना वनातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव/खोततळे बांधणे, कृत्रिम पाणवठे, (सिमेंट टाके बांधणे) इतयादी उपययोजना करण्यांत आलेल्या आहेत.

* वनाच्या सिमेलगत असलेल्या तोंडी नसलेल्या विहिरींना कठडे करण्यांत आले आहे.

* व्याघ्र प्रकल्पाच्या वनक्षेत्रातुन गेलेल्या विद्युत लाईनवर गस्त करण्यांत येते.

* अपघाती मृत्युला आळा घालण्यासाठी वाहतुकीच्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत गतीरोधक व विधि ठिकाणी वेग मर्यादा पालन करण्याच्या सुचना फलक लावण्यांत आलेले आहे.

* लोकांनी जंगलात जाऊन मानव-वन्यजीव संघर्ष होऊन नये म्हणुन उपलब्धतेनुसार गावकऱ्यांना निसतार दरावर फाटे, बांबू व सरपण उपलब्ध करुन देण्यात येते.

*ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून विविध योजनेतून एलपीजी गॅसचा पुरवठा करण्यात आला आहे.

* जिल्हा व्याघ्र कक्ष समितीची स्थापना करण्यांत आलेली असून त्यामध्ये मानव वन्यजीव संघर्षाच्या प्रकरणांचा आढावा घेण्यात येतो.

* रॅपिड रिस्पॉन्स चमूची स्थापना करण्यात आलेली असून त्यांना सर्व साहित्यासह वाहन उपलब्ध करुन देण्यांत आले आहेत. सद चमूद्वारे सतत गस्ती करुन मानव वन्यजीव संघर्ष रोखण्याचे कार्य करण्यांत येत आहे.

* चंद्रपूर, अमरावती व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यात आले असून त्यांचेद्वारे नियमितपणे रेल्वे स्टेशन /बस स्टँड /आठवडी बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांच्या अवैध व्यापार, वाहतूक याचा शोध घेण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगाव) शहरात रानडूकरांच्या हल्ल्यात हल्लाग्रस्त व्यक्तीना तसेच मृतांच्या नातेवाईकांना तातडीने मदत मिळणेबाबत**

**(२९) ५८४२७ (२४-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगाव) शहरात दिनांक १ जून, २०१६ रोजीच्या सुमारास रानडूकरांच्या हल्ल्यात ३ वर्षाच्या बालकांसह चार जण जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हल्लाग्रस्त व्यक्तीना तसेच मृतांच्या नातेवाईकांना कोणती तातडीने आर्थिक वा वैद्यकीय मदत देण्यात आली आहे काय,

(३) अद्याप कोणतीच मदत दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

मात्र दिनांक १७.०३.२०१६ रोजी पाचोरा तालुक्यातील मौजे सातगाव डोंगरी येथील कुणाल एकनाथ सोनवणे, वय ३ वर्ष हा शेतात खेळत असताना रानडुक्कराच्या हल्ल्यात किरकोळ जखमी झाला असल्याने जखमी बालकाचे पालकास रु. १५,०००/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्लोबल वार्मिंग व पर्यावरणाचा असमतोल यावर मात करण्यासाठी ट्री क्रेडीट अभिनव संकल्पनेबाबत**

**(३०) ५८६५८ (२४-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्लोबल वार्मिंग व पर्यावरणाचा असमतोल यावर मात करण्यासाठी झाडे लागवडीसाठी पुढाकार घेणाऱ्या लोकांना योग्य आणि आर्थिक मोबदला मिळवून देणेकरीता ट्री क्रीडेट हि अभिनव संकल्पना शासनाने मांडली असून याकरिता ५ जणाची समिती नेमली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या समितीत शासकीय अधिकारी यांच्या व्यतिरिक्त अन्य सदर विषयाचा गाढा अभ्यास असणाऱ्या व्यक्तीचा सदर समितीत अंतर्भाव केला जाणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) वृक्षांचे संरक्षण व संगोपन स्वच्छेने करण्यासाठी राज्यात वृक्ष गुण (ट्री क्रेडीट) या संकल्पनेची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्वंकष प्रस्ताव तयार करण्यासाठी ५ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली असून यामध्ये वृक्ष गुण संकल्पना प्रुस्तुत करणारे अशासकीय सदस्य श्री.तसनीम अहमद (निवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडदावणे व बोरिपाडा (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) या लघुपाटबंधारे योजनेच्या अपूर्ण कामाबाबत**

**(३१) ५८७७९ (२४-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडदावणे व बोरिपाडा (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) या लघुपाटबंधारे योजनेचे काम बंद असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना निधीअभावी बंद पडली आहे काय,

(३) असल्यास, योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच योजनेचे काम तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०४-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

गडदावणे व बोरीपाडा (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) या लघुपाटबंधारे योजनांना जलसंधारण महामंडळामार्फत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून निविदा कार्यवाही सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(२) सदर योजनेची निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दिनांक ८/५/२०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालावर दिनांक २४/९/२०१५ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या ४९ व्या बैठकीतील विषय क्र. ८ अन्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १/४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या (१२०० योजना) तसचे दिनांक १/४/२०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या (११३० योजना) परंतु प्रत्यक्षात क्षेत्रीय कामे सुरु झाली नाहीत अशा एकूण २३३० स्थगिती दिलेल्या योजनांपैकी दिनांक १/४/२०१४ पूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या ११३० योजनांपैकी जलयुक्त शिवार अंतर्गत येणाऱ्या १०१ योजनांची (किंमत रुपये ५९.०० कोटी) कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आणि उर्वरित स्थगिती दिलेल्या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा ठराव संचालक मंडळाने मान्यता रद्द करण्याचा ठराव संचालक मंडळाने पारित केला आहे. त्यास अनुसरुन, उपरोक्त ०२ योजनांचा स्थगिती दिलेल्या ११३० योजनांमध्ये समावेश आहे.

---

**सायन-पनवेल महामार्गवरील कामोठे शहरातून मुंबईकडे जाणारा अपूर्णावस्थेत असलेल्या जोडरस्त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याबाबत**

**(३२) ५८८२६ (२४-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गावरील कामोठे शहरातून मुंबईकडे जाणारा रस्ता अपूर्णावस्थेत असून या जोडरस्त्यामुळे वाहतुकीची कोंडी होवून लाखो लिटर इंधन वाया जात असल्याचे माहे जून २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त जोडरस्ता वन विभागाच्या हद्दीतून जात असल्यामुळे रस्त्याच्या रूंदीकरणासाठी वन विभागाची मान्यता असणे जरूरी आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त जोडरस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी वारंवार मागणी व तक्रार करून सुद्धा महामार्गाशी संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभाग व वन विभाग यांच्याकडून कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मुख्य वनसंचालक, प्रादेशिक विभाग, ठाणे यांच्याकडे जोडरस्ता पूर्ण होण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यासाठी बैठकीची वारंवार मागणी करून सुद्धा दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, शासनाने चौकशी करून अपूर्ण अवस्थेत असलेल्या जोडरस्त्याचे काम तातडीने पूर्ण होण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे

(६) असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरूप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१), (२) व (३) सायन पनवेल महामार्गाचे रुंदीकरणाचे मौजे कळंबोली यैथील भागात संरक्षित वनक्षेत्राचा तसेच काही भागात कांदळवन क्षेत्राचा समावेश आहे. वनक्षेत्राचा वापर वनेत्तर प्रयोजनासाठी करावयाचा झाल्यास त्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. त्याकरीता वनक्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वन विभागाकडे दाखल करण्यात आला होता. तथापि, प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील मार्गदर्शक सूचनांनुसार परिपूर्ण नसल्याने तसेच त्रुटींची पूर्तता करण्यासाठी प्रकल्प यंत्रणेस परत करण्यात आला आहे. प्रस्तावातील वनक्षेत्र निश्चित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे.

(४) हे खरे नाही.

सायन-पनवेल महामार्गावरील कामोठे शहरातून मुंबईकडे जाणारा अपूर्णावस्थेत असलेला जोडरस्त्याबाबत चर्चा करण्याकरिता बैठक घेण्याबाबत मा.आमदार श्री.प्रशांत ठाकूर यांनी सूचीत केल्यानुसार, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांनी दिनांक १६/०६/२०१६ रोजी सर्व संबंधितांसमवेत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये प्रकल्प यंत्रणेकडून वनजमिन मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव दाखल होत नसल्याने सदर प्रकल्पाचे कामास विलंब होत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे.

(५) व (६) सदर रस्त्याबाबत वन जमिन मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त होताच वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील मार्गदर्शक सूचनांनुसार वन विभागाकडून तात्काळ कार्यवाही करुन प्रस्ताव केंद्र शासनाचे मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

---

**माथेरान (नेरळ) चे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी येथील जंगलातील वनसंपती घोडयाच्या मलमूत्रामुळे नष्ट होत असल्याची तक्रार**

**(३३) ५८८७२ (२४-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (नेरळ) चे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी येथील जंगलातील वनसंपत्ती घोडयाच्या मलमूत्रामुळे नष्ट होत असल्याची तक्रार वनविभागाकडे एका वर्षापासून नागरिक करीत असल्याचे दिनांक २९ एप्रिल २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास बऱ्याच वर्षापासून माथेरान परिसरातील घोडेवाले आपल्या उदरनिर्वाहासाठी दस्तुरी येथे घोडे आणत व संध्याकाळी परत गावी नेत असत परंतु गेल्या काही महिन्यापासून घोडे दस्तुरी येथील जंगलातच बांधत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास घोडेवाल्याच्या उदरनिर्वाह आणि पर्यावरण व जंगल रक्षण यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) सन २०१२-१३ मध्ये या घोडेवाल्यांविरुध्द २ वनगुन्हे जारी करुन दंडनीय कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानंतर अशा घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.

(३) पर्यावरण व जंगल रक्षण यासाठी सदर क्षेत्रासमोर लोखंडी तारेचे कुंपण व रेलिंगचे काम करुन घेतले आहे. सदर क्षेत्रामध्ये २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत ५०० झाडे लावून घेतली आहेत. तसेच वनसंरक्षणाच्या पुरेपुर उपाययोजना करण्यात येत आहे. वनकर्मचाऱ्यांमार्फत दिवसा व रात्री गस्त घातली जाते.

---

**विदर्भात गेल्या दोन महिन्यात १० वाघांचा झालेला मृत्यू**

**(३४) ५९५४८ (२४-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात गत दोन महिन्यात १० वाघांचा मृत्यू झाल्याने केंद्र शासनाच्या व्याघ्र संरक्षण दलाच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, व्याघ्र संरक्षणासाठी टायगर प्रोटेक्शन फोर्स स्थापन करुनही वाघांच्या मृत्यूबाबत कोणत्याही उपायोजना केल्या जात नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

विदर्भात मागील २ महिन्यामध्ये २ नर, २ माद्या, १ नर बछडा अशा एकूण ५ वाघांचा मृत्यू झाला आहे. तथापि ह्यातला एकही मृत्यू शिकारीमुळे झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) विदर्भातील पाचही व्याघ्र प्रकल्पात ४ विशेष व्याघ्र दलांची (STPF) स्थापना करण्यात आली आहे. सदर व्याघ्र दलाकडून नियमितपणे गस्त केली जात आहे. तसेच वाघांच्या मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी व त्यांच्या संरक्षणाच्यादृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- जंगलामध्ये आवश्यक त्या ठिकाणी निरीक्षण मनोरे उभारण्यात आल आहे.
- संरक्षित क्षेत्रातील नैसर्गिक पाणवठे, कृत्रिम पाणवठ्याची वनकर्मचा-यांमार्फत नियमित तपासणी करण्यात येते.
- शिका-याबाबत गोपनियरित्या माहिती संकलित करण्यात येते.
- वनसंरक्षणात लोकांचा सहभाग वाढवा म्हणून वनालगत असलेल्या गावांमध्ये ग्रामस्थांची वनसंरक्षण समितीची स्थापना करण्यात आली असून त्यांची संरक्षणांच्या कामात मदत घेण्यात येते.
- अमरावती, चंद्रपूर व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यात आले असून त्यांचेव्दारे नियमितपणे रेल्वे स्टेशन/बस स्टँड/आठवडी बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्यप्राणयांच्या अवैध व्यापार, वाहतूक याचा शोध घेण्यात येतो.
- वनक्षेत्रांमधून जाणा-या विद्युत लाईनवर नियमितपणे गस्त करण्यात येते. तसेच विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेशी नियमितपणे संपर्क ठेवला जातो व संबंधित सबस्टेशनचे कार्यक्षेत्रात विद्युतप्रवाह खंडीत झाल्यास त्यांची माहिती घेवून विद्युतप्रवाहाव्दारे वन्यप्राण्यांच्या शिकारीचा प्रयत्न झाला किंवा कसे याची शहानिशा करण्यात येते.
- वनकर्मचा-यांमार्फत वनक्षेत्रात रात्र/दिवस नियमितपणे तसेच पावसाळी विशेष गस्त घालण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागील दोन वर्षात राज्यात १९ वाघ व ८१ बिबट्यांचा मृत्यु झाल्याची माहिती**

**(३५) ५९६१० (२४-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील दोन वर्षात राज्यात १९ वाघ व ८१ बिबट्यांचा मृत्यु झाल्याची धक्कादायक माहिती माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील १६ बिबट्यांचा बळी हा शिकाऱ्यांनी घेतला असून उर्वरित बिबट्यांचे मृत्यु हे ते पाण्याच्या शोधात असताना, वाहनाच्या धडक बसल्याने व आकस्मिक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार वाघांच्या व बिबट्यांच्या मृत्युस कारणीभूत असणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६)** :(१), (२) व (३) सन २०१४ ते सन २०१५ या कालावधीत राज्यात नैसर्गिकरित्या-१६, अपघाताने-२ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत कलम ११ अंतर्गत दिलेल्या परवानगीनुसार पारध करण्यात आलेला १ असे एकूण १९ वाघांचा व नैसर्गिकरित्या-६२, अपघाताने-५४ व शिकारीमुळे १५ असे एकूण १३१ बिबट्याचा मृत्यू झाला आहे.
(४) वाघांचा मृत्यू शिकारीमुळे झालेला नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातुर) वनविभागाचे विभागीय कार्यालय मंजुरी बाबत**

**(३६) ५९७९५ (२४-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथे विभागीय कार्यालय मंजुरीसाठी लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनविभागाच्या कार्यालय मंजुरीसाठी शासनाने कोणती उपाय योजना केली आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या यावर प्रतिक्रिया काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६)** :(१), (२) व (३) होय. औरंगाबाद वनवृत्तात उस्मानाबाद वनविभाग हा उस्मानाबाद व लातूर अशा दोन जिल्ह्यात विभागाला असून या विभागाचे वनक्षेत्र केवळ ९०.३० चौ.कि.मी. आहे व ते विखुरलेले आहे. तसेच यापूर्वी लातूर मुख्यालयासाठी सहायक वनसंरक्षकांचे १ पद स्थलांतरीत सुध्दा करण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत उदगीर, जिल्हा लातूर येथे स्वतंत्र नवीन उपविभाग सुरु करण्याची आवश्यकता नाही. याबाबत संबंधित लोकप्रतिनिधी यांना दि.२६.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये वस्तूस्थिती कळविलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील मावळ तालुक्यातील शिरोता पवननगर वडगाव**
**कामशेत येथील वनविभागाचा जागेवर झालेले अतिक्रमण**

**(३७) ५९९१३ (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मावळ तालुक्यातील शिरोता पवननगर वडगाव कामशेत येथील वनविभागाचा जागेवर अतिक्रमण करून माती व मुरूमसाठी बेकायदा डोंगर पोखरण्यात येत असल्याचे माहे मे २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून येथील गौणखनिजासाठी डोंगर पोखरणाऱ्यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-१०-२०१६) :**(१) पुणे वन विभागाच्या मावळ तालुक्यातील शिरोता, पवनानगर, वडगाव व कामशेत येथील वन विभागाच्या जागेवर अतिक्रमण करुन माती व मुरमासाठी बेकायदा डोंगर पोखरण्यात येत असल्याचे माहे मे, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले नाही.

तथापि, मावळ तालुक्यातील पवनानगर जवळील मौजे पानसोली येथील वनक्षेत्रात रस्ता केल्याप्रकरणी दिनांक २५.५.२०१६ रोजी वनगुन्हा नोंदविलेला आहे.
(२) उपरोक्त चार ठिकाणी अशा प्रकारची घटना घडलेली नसल्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, मौजे पानसोली येथे घडलेल्या गुन्ह्या प्रकरणी चौकशी व पुढील कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुनर्वसित केलेल्या कोयना प्रकल्पग्रस्तांना जमिनीवरुन निष्कासित करण्यासाठी दबाव टाकल्याचे निदर्शनास आल्याबाबत

**(३८) ५९९७० (२४-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा तालुक्यात (जि.पालघर) पडघा वनपरिक्षेत्रामध्ये कुसापूर या गावी पुर्नवसित केलेल्या कोयना प्रकल्पग्रस्ताना तेथील वनक्षेत्रपाल प्रकल्पग्रस्त गेल्या ४० वर्षापासून कसत असलेल्या जमिनीवरुन निष्कासित करण्यासाठी दबाव टाकीत आहेत ही बाब मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित प्रकल्पग्रस्तांनी लोकप्रतिनिधीमार्फत व वैयक्तिकरित्या या अन्यायाविरुद्ध वरिष्ठांकडे तक्रारी करुनही अद्यापी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत तसेच संबंधितंवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्हयातील अभयारण्यातील वन्य प्राण्यांच्या अपघाती मृत्यूबाबत

**(३९) ६००९८ (२४-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये सहा बिबट्या वाघ, दोन अस्वल, एक तडस व १२ रोहींचा अपघाती मृत्यू झाल्याची बाब माहे, जून २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशी मध्ये काय निष्पन्न झाले

(३) असल्यास, वन्य प्राण्यांचे अपघाती मृत्यू टाळण्याच्या अनुषंगाने शासन अभयारण्यातील मार्गावर दोन्ही बाजूने कुंपन घालुन उड्डाणपुल उभारण्याची उपाययोजना करणार आहे काय,

(४) असल्यास, कोणत्या उपाययोजना शासनाच्या विचाराधिन आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये रस्ता अपघातामध्ये २ रोही व १ चिंकारा हरीण अशा एकूण ३ वन्यप्राण्यांच्या मृत्यू झाला आहे.

(२) उपरोक्त ३ घटनांपैकी १ प्रकरणामध्ये वाहन चालकाने निष्काळजीपणे वाहन चालविल्याने वाहन चालकास दंड आकारण्यात आला आहे व उर्वरित २ प्रकरणामध्ये अज्ञात आरोपीविरुध्द वन्यगुन्हे जारी करण्यात आले आहेत.

(३) वन्य प्राण्यांचे अपघाती मृत्यू टाळण्याच्या दृष्टीने अभयारण्यातील मार्गावर दोन्ही बाजूने कुंपण घालून उड्डाणपूल उभारण्याची कोणतीही उपाययोजना प्रस्तावित नाही.

(४) सदर अपघात टाळण्याच्या दृष्टीने ज्ञानगंगा अभयारण्यातून जाणाऱ्या मार्गावरील वाहतुक रात्री १०.०० ते सकाळी ५.०० वाजपेर्यंत बंदी घालण्यात आली आहे. अभयारण्यातून जाणाऱ्या रस्त्यांवर वाहने हळू चालवावी तसेच वन्यजीवांचे संरक्षण करा अशा आशयाचे फलक लावून जनजागृती करण्यात येते, ठिकठिकाणी रस्त्यावर गतीरोधक तयार करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्हयातील हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यातील ताडोबा अभयरण्याला लागून असलेल्या गावांमध्ये पट्टेदार वाघ, बिबटयांच्या हल्लयामुळे शेतक-यांचे प्राण व शेत जमीनीचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत

**(४०) ६०२२१ (२४-०८-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यातील ताडोबा अभयरण्याला लागून असलेल्या खुर्सापार, हिवरा, गिरड, मंगरुळ, मोहगांव, शिवनफळ, ताडगांव, तावी, रासा,

धामनगांव, सिल्ली, दसोडा, आमडी, खेक-या गावांमध्ये पटटेदार वाघ, बिबटयांच्या हल्लयामुळे शेतक-यांचे प्राण व शेत जमीनीचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यातील ताडोबा अभयरण्याला लागून असलेल्या वन जमिनी व शेत जमीनचे हिस्त्र प्राण्यापासून संरक्षण मिळण्याकरीता या परिसरात शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, सदर भागात उपाययोजना न करण्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६)** :(१), (२) व (३) खुर्सापार, हिवरा, गिरड, मंगरुळ, मोहगाव, शिवनफळ, ताडगाव, तावी, रासा, धामणगाव, सिल्ली दसोडा, आमडी, खेक-या या गावांचा वर्धा वनविभागातील समुद्रपूर वनपरिक्षेत्रात समावेश होतो.

समुद्रपूर वनपरिक्षेत्रात सन २०१६-१७ (जुलै, २०१६ अखेर) मध्ये वन्यप्राण्यांव्दारे शेतपिकांच्या नुकसानीची १३ व पशुधनहानीचे १ अशी एकूण १४ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयान्वये संबंधितास नुकसान भरपाईपोटी रु.१,३५,९५०/- अदा करण्यात आले आहेत.

उन्हाळ्याच्या दिवसात वन्यप्राणी जंगलक्षेत्राचे बाहेर पडू नये व मानव वन्यप्राणी संघर्ष होऊ नये म्हणून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- वर्धा वनविभागाचे जंगल क्षेत्रात १३४ कृत्रिम/नैसर्गिक पाणवठे असून त्यातील १६ ठिकाणी सौर पंप बसवण्यात आले आहेत.
- आमगाव खडकी व बोर कोकाटे येथे वनक्षेत्रात प्रायोगिक तत्वावर सौर कुंपण बसविण्यात आले आहे.

---

**खामगांव मतदार संघातील वन परिक्षेत्रात इको टुरिझम अंतर्गत निधी मिळणेबाबत.**

**(४१) ६०५३३ (२४-०८-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव मतदार संघातील ज्ञानगंगा वन परिक्षेत्रातील नक्षत्र बन, बोथा येथे इको टुरिझम अंतर्गत विकास करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींना निधी मिळणेबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन परिक्षेत्रात बुलढाणा जिल्हा परिसरात एकही वन पर्यटन क्षेत्र नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, खामगांव तालुक्यातील नक्षत्रबन बोथा परिसरात इको टुरिझम साठी निधी मंजूर करण्यात येणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६)** :(१) होय,

खामगांव मतदार संघातील ज्ञानगंगा वन परिक्षेत्रातील नक्षत्रबन, बोथा येथे इको टुरिझम अंतर्गत विकास करण्यासाठी मा.ॲड. आकाश पांडुरंग फुंडकर, विधानसभा सदस्य (खामगाव) यांनी खामगांव मतदार संघातील वनपरिक्षेत्रात इको टुरिझम मध्ये निधी मिळणेबाबत मागणी केली आहे.

(२) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्ह्यात वनपर्यटन / इको टुरिझम या योजनेअंतर्गत सैलानी वनपर्यटन, काळापाणी रोपवाटीका, देळप रोपवाटीका, मोहेगाव ही वनपर्यटन स्थळे आहेत.

(३) बोथा येथील नक्षत्रबनासाठी सन २००९-१० ते २०११-१२ या कालावधीत रु.१९.३५ लक्षची विकास कामे इको टुरिझम अंतर्गत करण्यात आली आहेत. सन २०१६-१७ मध्ये बोथा परिसरात इको टुरिझम साठी निधी प्रस्तावित नाही. तथापि ज्ञानगंगा अभयारण्यात निसर्ग पर्यटन विकासाकरिता सन २०१५-१६ साठी २४.०० लक्ष व सन २०१६-१७ करिता रु.१२.२० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

---

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत (ता.चिखलदारा, जि.अमरावती) आदिवासी गावातील प्रकल्पग्रस्तांच्या अनुदानामध्ये लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(४२) ६०८२१ (२४-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत तालुका चिखलदरा जिल्हा अमरावती येथील आदिवासी गावातील प्रकल्पग्रस्तांच्या अनुदानामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार करणारे डीएफओ श्री.वर्मा आणि कर्मचारी श्री.राठोड यांचेविरुद्ध कारवाई होणेबाबत स्थानिक लोकप्रतनिधी यांनी दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी आणि दिनांक ११ मे, २०१६ रोजी स्मरणपत्र देवून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गुल्लारघाट, केलपानी, सोमाठाना-खुर्द, धारगड, बारुखेडा, आमोना या गावामधील आदिवासी गावातील प्रकल्पग्रस्तांच्या अनुदान वितरणात झालेल्या अनियमिता आणि गैरव्यवहाराबाबत दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे,

(३) तसेच सदर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांच्या वेतनातून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे. सदर विषयाबाबत अचलपूर विधानसभा सदस्य यांनी दिनांक ०८.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये आणि दिनांक ११.०५.२०१६ रोजीच्या स्मरणापत्रान्वये श्री.वर्मा, डी.एफ.ओ. आणि कर्मचारी श्री.राठोड यांचयाविरुध्द कारवाई होणेबाबत मागणी केली आहे.

(२), (३) व (४) मौजे धारगडचे सन २०११-१२ मध्ये बारुखेडा सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये आमोना सन २०१०-११ मध्ये गुल्लरघाटचे सन २०१२-१३ मध्ये केलपानी सन २०१४-१५ मध्ये आणि सोमठाणा-खुर्द सन २०१३-१४ मध्ये पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

मौजे धारगड, बारुखेडा व आमोना या गावांचे पुनर्वसन हे श्री. यु. यु. वर्मा हे उपवनसंरक्षक, अकोट वन्यजीव विभाग या पदावर दिनांक १४.०२.२०१३ रोजी रुजू होण्यापूर्वीचे आहे. श्री. यु. यु. वर्मा हे उपवनसंरक्षक, अकोट वन्यजीव विभाग या पदावर रुजू झाल्यानंतर गुल्लरघाट केलपानी व सोमठाणा खुर्द या गावांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. सदर गावांच्या पुनर्वसन प्रक्रियेतील अनुदान वितरणात कोणतीही अनियमितता आणि भ्रष्टाचार झाला नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

---

**मारेगांव वनपरीक्षेत्रातील अतिक्रमण क्षेत्रावर करण्यात आलेल्या कामामध्ये अनियमीतेबाबत**

**(४३) ६१७०३ (२४-०८-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगांव (ता.वणी) वनपरीक्षेत्रातील अतिक्रमण क्षेत्रावर करण्यात आलेल्या कार्याची निवीदा प्रक्रीया राबविली नसल्याने दिनांक ५ मे २०१६ रोजी त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, अतिक्रमण क्षेत्रातील गावामध्ये ग्राम पंचायत कार्यालयाला दर पत्रक लावणे आवश्यक असतांना कोणतेही दर पत्रक लावले नाही. अतिक्रमण क्षेत्रात घेतलेल्या रोपवनात खडडयाचा दराबाबत कामावर उपस्थित असणा-या मजुरांना दरपत्रकानुसार मजुरी दिली नाही, हे खरे आहे काय

(३) असल्यास, संबधित अधिकारी यांनी अतिक्रमण क्षेत्रात केलेल्या कामामध्ये अनियमीतता आढळल्यास कार्यवाही करणार काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) व (२) नाही.

पांढरकवडा वन विभागातील मारेगांव वन परिक्षेत्रामधील अतिक्रमण हटविल्यानंतर सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रोपवनाकरिता समतल चर व खड्डे खोदण्याची कामे वनक्षेत्रालगत असलेल्या गावातील मजुरांकडून करण्यात आली. रोपवन कामाव्यतिरिक्त इतर कामांची निविदा प्रक्रिया राबविली जाते. रोपवनाच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया राबविली जात नाही. यास्तव रोपवनाच्या कामासाठी विभागीय स्तरावरुन दरपत्रके मंजुर केली व पुर्व पावसाळी कामांच्या अनुषंगाने खड्डे खोदण्याच्या दराबाबत मजुरांना अवगत करुन तद्नंतर अंदाजपत्रकाप्रमाणे मंजुर असलेल्या दरानुसार मजुरी देवून खड्डे खोदण्याची कामे करुन घेण्यात आली. त्यानुसार सन २०१६ च्या पावसाळ्यात रोपांची लागवड यशस्वीरित्या करण्यात आली असून सद्यःस्थितीत लागवड केलेली सर्व रोपे जिवंत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करगव (ता.पाथरी, जि.चंद्रपूर) येथील तेंदू पत्ता गोळा करण्यासाठी गेलेल्या एका महिलेवर रानडुकराने केलेला हल्ला**

**(४४) ६२५४८ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करगव (ता.पाथरी, जि.चंद्रपूर) येथील तेंदू पत्ता गोळा करण्यासाठी गेलेल्या एका महिलेवर रानडुकराने दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास हल्ला केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हल्ल्यातील ही महिला गंभीर जखमी झाली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जखमीग्रस्त महिलेला कोणत्या प्रकारची तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) व (२) सावली परिक्षेत्रातील नियतक्षेत्र पाथरीमधील आकापुर येथे दिनांक ०१.०५.२०१६ रोजी सौ. निरंजना आदाराव वलादे या तेंदू पत्ता गोळा करण्यासाठी गेल्या असता रानडुक्कराच्या हल्ल्यात किरकोळ जखमी झाल्या आहेत.

(३) सदर महिलेने शासकीय रुग्णालयात उपचार घेतला असून प्रचलित शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार औषधोपचाराचा खर्च रु. २,१४०/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे.

---

**चंद्रपूर जिल्हयात शासकीय कार्यालयांतर्गत वृक्ष लागवडीत होत असलेला गैरव्यवहार**

**(४५) ६२७४१ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात शासकीय कार्यालयांतर्गत प्रत्येक वर्षीच्या पावसाळ्यात कोटयवधी रुपये खर्च लाखो वृक्षांची लागवड करण्यात येते परंतु त्यांची नोंद कागदोपत्री नसल्याने पुन्हा त्यात खड्डयात पुन्हा झाडे लावण्यात येऊन गैरव्यवहार होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) अद्याप चौकशीनुसार कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

चंद्रपूर वनवृत्ताअंतर्गत प्रत्येक वर्षीच्या पावसाळ्यात वृक्षांची लागवड करण्यात येत असून त्यांची नोंद कागदोपत्री करण्यात आलेली आहे. सन २०१२ मध्ये ३६.३५ लाख रोपे, सन २०१३ मध्ये ३३.६६ लाख रोपे, सन २०१४ मध्ये ३०.०६ लाख रोपे व सन २०१५ मध्ये ३५.७१ लाख रोपे लावण्यात आली असून माहे मे, २०१६ अखेर जिवंत रोपांची सरासरी टक्केवारी अनुक्रमे ७५%, ७५.७९%, ८२.४९% व ८३.७१% इतकी आहे. तसेच सन २०१६ मध्ये ३३.९१ लाख रोपे लावण्यात आली आहेत. त्यामध्ये १ जूलै, २०१६ रोजीच्या २ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत १४.१० लक्ष रोपांचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आदगांव (ता.श्रीवर्धन) या वन विभागाच्या राखीव जागेतून रस्ता काढल्याबाबत**

**(४६) ६२८७६ (२४-०८-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आदगांव (ता.श्रीवर्धन) ग.नं १५२/३ क्षेत्रामध्ये जाण्याकरिता एका विकासकाने मौजे आदगांव जुना स.नं ४७/० गट नंबर १५३/० या वन विभागाच्या राखीव जागेतून रस्ता काढल्याचे नुकतेच माहे जून ,२०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन जमिनीतून रस्ता असून सदर रस्ता कागदोपत्री नमुद नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्ता वन विभागाच्या राखीव जागेतून काढला असल्यामुळे उक्त रस्ता काढून टाकण्यात यावा यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी विधानसभेमध्ये विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधूनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषी विकासकांवर शासन स्तरावर कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच उक्त राखीव जागेतून काढण्यात आलेला रस्ता काढून टाकण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-१०-२०१६) :**(१) मौजे आदगांव ता. श्रीवर्धन ग.नं. १५३/० चा जूना सर्व्हे नंबर ४३/० असून त्याचा जूना सर्वे नं ४७/० शी संबंध नाही. सदर गट नं. १५३/० हे क्षेत्र अवर्गीकृत वन असून या जागेतून गट नं. १५२/३ या खाजगी क्षेत्रामध्ये जाण्याकरिता कोणत्याही विकासकाने रस्ता काढण्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(२) मौजे आदगांव येथील वन सर्व्हे नंबर ४३ (गट नं १५३) कंपार्टमेंट क्रमांक ७१० च्या क्षेत्राची पाहणी करण्यात आली असून त्या भागात ३३० मिटर लांबीचा एक पूर्वीचा (८ फुट रुंदीचा) जूना पायवाट आहे रस्त्यावर मोठमोठे दगड असून त्या रस्त्यावर चारचाकी वाहन धावू शकत नाही.

(३) प्रकरणी वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी कुपतोडीच्या कामासाठी सन १९७८ ते १९८० दरम्यान वनखात्याने तात्पुरते जागेची पाहणी केली असून रस्ता तयार केलेला होता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवण व देवळा तालुक्यातील (जि.नाशिक) मांगबारी घाट ते पिळकोस चौरंगनाथ किल्ला, चाचेर, पांढरीपाडा या डोंगररांगेवर वनविभागाच्या हद्दीत शिकारी टोळीकडून प्राण्यांची शिकार केली जात असल्याबाबत**

**(४७) ६३९५४ (२४-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण व देवळा तालुक्यातील (जि.नाशिक) मांगबारी घाट ते पिळकोस चौरंगनाथ किल्ला, चाचेर, पांढरीपाडा या डोंगररांगेवर वनविभागाच्या हद्दीत शिकारी टोळीकडून प्राण्यांची शिकार केली जात असल्याचे माहे जून, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवळा वनविभागाच्या हद्दीत कुऱ्हाडबंदी असतानाही मांगबारी घाटाच्या जंगलात चुलीच्या सरपणासाठी झाडांची वृक्षतोड केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील वन्यजीवांची शिकार करणाऱ्या टोळ्यांना प्रतिबंध घालून जंगलातील झाडे व पशुपक्ष्यांना अभय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) संयुक्त वन व्यवस्थापन समिती तसेच क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचेमार्फत जंगल संरक्षण तसेच वन्यजीव संरक्षणाची कामे करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झरी तालुक्यातील (जि.यवतमाळ) पवनार जंगलात**
**पट्टेदार वाघीणीचा मृत्यू झाल्या प्रकरणाबाबत**

**(४८) ६३९७० (२४-०८-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी तालुक्यातील (जि.यवतमाळ) पवनार जंगलात पट्टेदार वाघीणीचा मृत्यू झाल्या प्रकरणी ग्रामस्थांनी वन विभाग कार्यालयाला घेरावा घातला व जमावाने दगडफेक केल्याची घटना माहे मार्च, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमावाला रोखण्यासाठी वन विभागाने हवेत गोळीबार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार वाघाणीच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) व (२) होय हे खरे आहे. सदर प्रकरणातील संशयितांना सोडविण्यासाठी ग्रामस्थांनी वन परिक्षेत्र कार्यालयास घेराव घातला होता. जमावास पांगविण्यासाठी वन परिक्षेत्र अधिकारी यांना हवेत गोळीबार केला.

(३) व (४) श्री.शंकर संभाजी कुर्ले व श्री. प्रविण शंकर कुर्ले रा.पिल्की वाढोणा, ता.वणी, जि.यवतमाळ यांनी शेतात विद्युत प्रवाह लावला होता. त्या विद्युत प्रवाहाचे धक्याने वाघिणीचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

प्रस्तुत प्रकरणी उक्त दोन्ही संशयितांना न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, झरी येथे हजर करुन एफसीआर घेण्यात आला आहे. सदर प्रकरण न्यायालयात दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**झरी तालुक्यातील (जि.यवतमाळ) खडकडोह येथील जंगलात वाघाच्या हल्ल्यात तीन गायी मृत झाल्याबाबत**

**(४९) ६३९७२ (२४-०८-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी तालुक्यातील (जि.यवतमाळ) खडकडोह येथील जंगलात वाघाच्या हल्ल्यात तीन गायी ठार झाल्या असल्याची माहिती माहे जून, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटनेमुळे पुन्हा ग्रामस्थांमध्ये दहशत निर्माण झाली असून वन विभागाने या वाघांचा ताबडतोब बंदोस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गायींवरील हल्ल्यानंतर गायींच्या मालकास शासनाकडून आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(४) तसेच सदरहू परिसरातील वाघांच्या बंदोबस्त करण्याबाबत वन विभाग काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने घटनास्थळी जमा झालेल्या ग्रामस्थांनी वाघाचा बंदोस्त करण्याची मागणी केली आहे.

(३) प्रचलित शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार वाघाच्या हल्यात पशुधनाची हानी झालेल्या मालकास नुकसान भरपाई म्हणून रु.३०,०००/- अदा करण्यात आली आहे.

(४) वाघाचा उपद्रव जाणवणा-या गावात गावकरी व वन कर्मचारी ह्यांची संयुक्त गस्त पथके तयार करून ग्रस्त घातली घालण्यात येत आहे. कॅमेरा ट्रॅपव्दारे वाघांचे हालचालीचे निरीक्षण करुन त्यांच्या वास्तव्याबाबत तसेच मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारीबाबत ग्रामस्थांना अवगत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा - मावळ तालुक्यातील आंदर मावळ व नाणे मावळ परिसरातील घनदाट वन क्षेत्रातील वन्य जीवांचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत**

**(५०) ६४४२२ (२४-०८-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा - मावळ तालुक्यातील आंदर मावळ व नाणे मावळ परिसरातील घनदाट वन क्षेत्रातील पवनचक्क्या व वाढता मानवी हस्तक्षेप यामुळे वन्य जीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या भागात विंड वर्ल्ड कंपनीने वीज निर्मितीसाठी पवनचक्की उभारण्यासाठी सह्याद्रीच्या लाखो वृक्षांची वृक्षतोड केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, पवन चक्की असणाऱ्या ठिकाणी वृक्ष लागवड केलेली नाही तसेच वन क्षेत्रात वनवा लागून वन्य जीवांचा मृत्यू होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन्यजीवांचे रक्षण करण्याकरिता शासनाचे वतीने कोणती उपाययोजना करण्यात आली आहे

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या दिनाक १०.१२.२००९ रोजीच्या आदेशान्वये मे.इनरकॉन इंडिया लिमिटेड, पुणे या कंपनीच्या पवनचक्की प्रकल्पाकरीता मंजूर वनक्षेत्रातील १४,२८४ वृक्ष तोडीस अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

वृक्षतोडीच्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडून आंदर मावळ वनक्षेत्रात १,००,९२३ औषधी वनस्पतीच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.